महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस, ३ रा मजला,
शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट,
मुंबई ४०० ०२१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२०२२४७५ संकेतस्थळ - www.mahakosh.in
फॅक्स क्रमांक ०२२-२२०२५२७९ ईमेल आयडी aoexamdat.mum-mh@gov.in

क्र.संलेको/परीक्षा/१७/मविलेसे वर्ग-३ परीक्षा/ २०८ दिनांक :-
23 MAY 2017

प रि प त्र क

विषय :-महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट -ब (अराजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी परीक्षेरीता सादर केलेल्या अर्जाबाबत(सुधारित -गट-ब-राजपत्रित सलेअ)

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट -ब (अराजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी या परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, सर्व प्राप्त अर्जातील तपशिल संचालनालयाच्या महाकोष या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट क (अराजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी या परीक्षेची तारीख जाहीर होण्यापूर्वी प्राप्त अर्जाची छाननी करुन अर्जातील तपशील प्रसिध्द करण्यात येत आहे. या तपशीलात काही बदल असल्यास तसे प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत कळविण्यात यावे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षेची तारीख जाहीर होण्याच्या अधीन राहून प्राप्त अर्ज वय वर्ष ४० पूर्ण होईपर्यंत संचालनालयाकडे प्राप्त असल्याचे समजण्यात यावे. त्यामुळे नव्याने अर्ज पाठवू नयेत.

तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्र. DAT-१०६४/५८४-C/XIII, दिनांक ०१/०२/१९६५ च्या नियम ६(a)(b) मधील तरतूदीनुसार ४० वर्षे झालेल्या उमेदवारांची नावे यादीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली नाहीत. मात्र या परीक्षेकरीता वय वर्षे ४० वरुन ४५ वर्षे करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ०८/०२/२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांना ४० वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांचे अर्ज शासनाकडून प्रस्तावाबाबत कार्यवाहीच्या अधिन राहून स्थगित ठेवण्यात आले आहेत.

सदर यादी सर्व उमेदवारांना माहितीसाठी आहे. अंतिम मान्यता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(अ. चां. कोल्हे)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

सोबत :- उमेदवारांची यादी. (प्रपत्र १ ते ५)